**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक २४ मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **नागपुरातील अंबाझरी धरणाच्या मजबुतीकरण कार्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली पाहणी; संभाव्य पुरस्थिती टाळण्यासाठी तात्पुरत्या व्यवस्था केल्या सुनिश्चित.**
2. **अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना जाहीर.**
3. **77 व्या कान चित्रपट महोत्सवात एफटीआयआय चे विद्यार्थी चिदानंद एस नाईक यांच्या "सनफ्लावर्स वेअर द फर्स्ट वन्स टू नो" चित्रपटाला पुरस्कार.**

4. **विदर्भातील अकोला, अमरावती आणि चंद्रपूरमध्ये उष्णतेची लाट.**

*****

अंबाझरी धरण

नागपूरच्या अंबाझरी धरणाच्या ओवर फ्लोमुळे मागच्या वर्षी सप्टेंबर महिन्यात पुरासारखी स्थिती नागपूर शहरात निर्माण झाली होती. ही स्थिती टाळण्यासाठी अंबाझरी धरणातील पाणी पातळीचा निचरा होण्यासाठी तीन गेट बसवण्याचे काम पुढील सहा महिन्यात पूर्ण होणार आहे. सध्या जे स्टॅटिक गेट आहे त्यातून वाढत्या पातळीचे व्यवस्थापन करण्यात येणार असल्याची माहिती आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंबाझरी धरणातील मजबुतीकरणच्या कार्याची पाहणी केल्यानंतर प्रसारमाध्यमांना दिली. अंबाझरी फ्लो च्या प्रवाहामध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या काही बांधकामांचे तोडण्याचे काम सुरू आहे .सध्या पूर परिस्थिती टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व तात्पुरत्या व्यवस्था  करण्यात आल्याच देखील फडणवीस यांनी स्पष्ट केल.

लोखंडी जाळी

नागपूर शहरातून वाहणाऱ्या नाल्यांच्या पूलांवर लोखंडी जाळी लावण्याचा महत्वाकांक्षी निर्णय नागपूर महानगरपालिकेद्वारे घेण्यात आलेला आहे. पुलावरून कुणीही नाल्यांमध्ये कचरा टाकू नये यासाठी उपाययोजना म्हणून दहाही झोनअंतर्गत

नाल्यांच्या पूलांवर दोन्ही बाजूला ही जाळी लावण्यात येणार आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार शहरातील दहाही झोनमधून नाल्यांवरील ५८ ठिकाणे निश्चित करण्यात आले आहेत. या पूलांवर जाळी लावण्याचे काम सुरू करण्यात येत आहे. पूलांवरून मोठ्या प्रमाणात कचरा नाल्यांमध्ये टाकला जातो. त्यामुळे वाहणाऱ्या पाण्याला अडथळा निर्माण होतो. या समस्येवर उपाययोजना म्हणून मनपाद्वारे दहाही झोनमधील नाल्यांच्या ५८ पुलांवर दोन्ही बाजूला मजबूत लोखंडी कठडे आणि त्यावर जाळी लावण्यात येत आहे.लक्ष्मीनगर झोनअंतर्गत खामला चौक सहकार नगर घाट यासह एकूण ५ ठिकाणी सुरक्षा जाळी लावली जाणार आहे. याशिवाय धरमपेठ झोनमधील अंबाझरी ओव्हर फ्लो, यशवंत स्टेडियम नाग नदी, भोले पेट्रोल पम्प जवळील नाला यासह एकूण ११ ठिकाणी, हनुमान नगर झोनमधील मानेवाडा घाट बेसा रोड यासह एकूण ५ ठिकाणी, धंतोली झोनमधील नरेंद्र नगर चौक, सरदार पटेल चौक घाट रोड यासह एकूण ७ ठिकाणी, नेहरू नगर झोनमधील जगनाडे चौक नाला यासह एकूण ४ ठिकाणी, गांधीबाग झोनमधील गंगाबाई घाट पुलासह एकूण ५ ठिकाणी, सतरंजीपुरा झोनमधील शांतीनगर नाला जैन मंदिर जवळ यासह एकूण ५ ठिकाणी, लकडगंज झोनमधील कृषी विद्यापीठासह एकूण ५ ठिकाणी, आशीनगर झोनमधील अशोक चौक नाला यासह ६ ठिकाणी आणि मंगळवारी झोनमधील पोलिस तलाव चौक यासह ५ ठिकाणी सुरक्षा जाळी लावण्यात येणार आहे.

गव्हाची खरेदी

रब्बी विपणन हंगाम 2024-25 दरम्यान गव्हाची खरेदी देशभरातील प्रमुख खरेदी करणाऱ्या राज्यांमध्ये सुरळीतपणे सुरू आहे. या वर्षात आतापर्यंत 262.48 लाख मेट्रिक टन गहू खरेदी करण्यात आला असून, केंद्रीय साठ्यात गेल्या वर्षी झालेल्या एकूण 262.02 लाख मेट्रिक टन खरेदीला मागे टाकत यावर्षी गव्हाची खरेदी झाली आहे. निर्देशित खरेदी केल्यामुळे, केंद्रीय साठ्यामध्ये सध्या गहू आणि तांदूळ यांचा एकत्रित साठा 600 लाख मेट्रिक टनाच्या पुढे गेला आहे. यामुळे देशाला प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजना (PMGKAY) आणि इतर कल्याणकारी योजनांतर्गत नागरिकांच्या अन्नधान्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि बाजारातील धान्य उपलब्धतेसाठी देखील सुखावह स्थिती निर्माण झाली आहे.

बनावट सिमकार्ड

दूरसंचार विभागाने 6.80 लाख मोबाईल कनेक्शनवर लक्ष केंद्रित केले असून ही कनेक्शन्स अवैध, अस्तित्त्वात नसलेल्या किंवा ओळखीचे बनावट/फेरफार केलेल्या पुराव्यांच्या आणि पत्त्यांच्या केवायसी कागदपत्रांचा वापर करून मिळवल्याचा संशय आहे.मोबाईल कनेक्शन्सची विश्वासार्हता आणि डिजिटल व्यवहारांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी दूरसंचार विभागाने फेर-पडताळणी करण्यास सांगितले आहे. सर्वांसाठी सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करण्यासाठी दूरसंचार विभाग वचनबद्ध आहे असं निवेदनात म्हंटलं आहे.

नाट्य परिषद

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना जाहीर करण्यात आला आहे. मुंबईच्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीनं दरवर्षी १४ जूनला गो.ब.देवल पुरस्कार समारंभाचं आयोजन करण्यात येतं. मागील तीन वर्षांपासून पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं नव्हतं. माटुंगा इथल्या यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुलात येत्या १४ जूनला सायंकाळी ४:०० वाजता सर्व पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली आहे. 'दरवर्षी नाट्य क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या नाट्यकर्मींचा सन्मान नाट्य परिषदेच्या वतीनं केला जातो. यानिमित्तानं कलावंतांचा मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. तसंच १०० व्या नाट्यसंमेलनानिमित्त घेण्यात आलेला 'नाट्यकलेचा जागर' यातील सर्वोत्कृष्ट पारितोषिक प्राप्त एकांकिका, बालनाट्य, एकपात्री, नाट्यछटा, नाट्यसंगीत पद गायन, नाट्य अभिवाचन कार्यक्रम यानिमित्तानं सादर होणार आहेत. कलावंत आणि नाट्य रसिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावं,' असं आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी केलं आहे.

एफटीआयआय विद्यार्थी पुरस्कार

केंद्रीय माहिती आणी प्रसारण मंत्रालयाच्या अधीन पुणे येथील एफटीआयआय, अर्थात भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या चिदानंद नाईक या विद्यार्थ्यानं दिग्दर्शित केलेल्या 'सनफ्लावर्स वेअर द फर्स्ट वन्स टू नो' (Sunflowers Were The First Ones To Know) या लघुपटाला ७७व्या कान चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट लघुपटाचा 'ल सिनेफ' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर

झाला आहे. या चित्रपटाचं कथानक कर्नाटकातल्या लोककथेवर आधारित आहे. याचं चित्रीकरण सूरज ठाकुर, संकलन मनोज व्ही. आणि ध्वनिसंयोजन अभिषेक कदम यांनी केलं आहे. जगभरातल्या ५५५ चित्रपट प्रशिक्षण संस्थांमधून आलेल्या २ हजार २६३ लघुपटांमधून निवड झालेले १८ चित्रपट या पुरस्काराच्या स्पर्धेत होते.

इनडोअर स्टेडियम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रवी नगरस्थित क्रीडा संकुलात मल्टीस्टोरी मल्टीपरपज इनडोअर स्टेडियमच्या बांधकामास प्रारंभ झाला आहे. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी नुकतीच विद्यापीठाच्या क्रीडा परिसराला भेट देत इनडोअर स्टेडियमचे बांधकाम गतीने करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. इनडोअर स्टेडियमचे काम दर्जेदार व्हावे आणि वेळेत पूर्ण व्हावे यासाठी अधिक वेगाने करण्याच्या सूचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. विद्यापीठाचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आंतरराष्ट्रीय दर्जाचा व्हावा या दृष्टिकोनातून इनडोअर स्टेडियमची इमारत तयार होत असतानाच स्टेडियममध्ये होऊ घातलेल्या खेळ प्रकारांसाठी लागणाऱ्या क्रीडा साहित्याची सूची तयार करून निवड करणे आदी प्रशासकीय मान्यता घेणेस्तव प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावा, असे निर्देश कुलगुरूंनी क्रीडा विभागाचे संचालक डॉ शरद सूर्यवंशी यांना दिले. अद्यावत प्रकाश योजनेमुळे दिवस-रात्र (डे नाईट) सामने या ठिकाणी घेता येणार आहेत.

खिरीचे वाटप

बुद्ध जयंती निमित्त चक्रवर्ती सम्राट अशोक फौंडेशनच्या वतीने बेजनबाग मैदानावर तयार करण्यात आलेल्या 2586 किलो खिरीचे वाटप करण्यात आले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुमारे 500 भिख्खू उपस्थित होते. यावेळेला त्यांनी पटांगणावर महापरित्राणपाठ तसेच बौद्ध धर्मातील सर्व सुत्ताचे पठण केले. महापरित्राणपाठ समाप्तीनंतर हा प्रसाद बौद्ध उपसकाना वितरित करण्यात आला.

हवामान

गेल्या 24 तासात विदर्भात सर्वाधिक तापमान अकोला जिल्ह्यात 45.5 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. या उन्हाळ्यातील हे आज पर्यंतचे उच्चांकी तापमान आहे,. त्या पाठोपाठ अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर तसेच वर्धा या

जिल्ह्यांमध्ये तापमान 43 अंश सेल्सिअसच्या घरात आहे. अकोला, चंद्रपूर, वर्धा आणि अमरावती इथं उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला असून या ठिकाणी स्थानिक प्रशासनातर्फे नागरिकांना उष्मा प्रतिबंधक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. भंडारा आणि गोंदिया इथं प्रत्येकी 40° च्या घरात तापमान आहे. दरम्यान आज बुलढाणा आणि वाशिम वगळता विदर्भात सर्वत्र विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा हवामान खात्याने वर्तवला आहे. उद्या देखील अमरावती अकोला नागपूर भंडारा गोंदिया आणि गडचिरोली वादळी पर्जन्यमान राहू शकतं. यासाठी हवामान खात्याने येलो अलर्ट जारी केला आहे.

*****